पेज संख्या : 01
मूल्य : 02/-
Thursday
29th January
2026

# न्युज एक्सप्रेस 18 महाराष्ट्र

## पिंपरी चिंचवड, पुणे,ऑल महाराष्ट्र

महाराष्ट्रात बातमी जिथे न्युज एक्सप्रेस18 महाराष्ट्र तिथे *💐 💐
अल्पावधीतच जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचणारे एकमेव डिजिटल न्युज..न्युज एक्सप्रेस18 महाराष्ट्र

मुख्य संपादक श्रीनिवास माने
7875034349/7276134349

RNI: Reg-MH26-012128316

उपसंपादक :- अरिफ शेख
9822786942/9028276786



### महाराष्ट्राने एक अनुभवी, कर्तृत्ववान आणि विकासाभिमुख नेता गमावला – खासदार श्रीरंग बारणे

पिंपरी :- राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक अनुभवी, कर्तृत्ववान आणि विकासाभिमुख नेता गमावला असल्याची भावना खासदार श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केली आहे. अजितदादा पवार हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. कामाप्रती प्रचंड निष्ठा असलेले नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. राज्यातील विविध विकासकामांच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा राहिला असल्याचे बारणे यांनी सांगितले.

खासदार श्रीरंग बारणे यांनी म्हटले आहे की, अजितदादा पवार यांच्या संसदीय राजकारणाची सुरुवात पिंपरी-चिंचवड परिसरातून झाली होती. पिंपरी-चिंचवडचा समावेश असलेल्या बारामती मतदारसंघातून त्यांनी १९९१ मध्ये लोकसभेची निवडणूक लढवली होती. त्या काळापासून त्यांचे पिंपरी-चिंचवड शहराशी अतूट नाते निर्माण झाले होते. एकत्र काँग्रेस पक्षात असताना अजितदादा पवार यांच्यासोबत जवळून काम करण्याची संधी मिळाल्याचे खासदार बारणे यांनी नमूद केले. नेता म्हणून त्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून त्यांच्या सहवासातून राजकारणातील अनेक बारकावे शिकता आले, असेही त्यांनी सांगितले.

सर्वसामान्य कुटुंबातील अनेक कार्यकर्त्यांना घडवून मोठे करण्याचे काम अजितदादा पवार यांनी केले. स्पष्ट वक्ता, निर्भिड आणि रोखठोक भूमिका हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य होते. “जे पोटात तेच ओठावर” ही त्यांची ओळख होती. पिंपरी-चिंचवड शहरावर अजितदादा पवार यांचे विशेष प्रेम होते. नियोजनबद्ध विकासाच्या माध्यमातून त्यांनी शहराला वेगळ्या उंचीवर नेले. शहराचा सर्वांगीण विकास करताना त्यांनी जागतिक पातळीवर शहराची ओळख निर्माण करण्यासाठी मोठे योगदान दिले.

अजितदादा पवार यांच्या अकाली निधनामुळे पिंपरी-चिंचवड शहर पोरके झाले असून राज्याचेही मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या निधनाने पवार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे भावनिक शब्दांत खासदार श्रीरंग बारणे यांनी श्रद्धांजली अर्पण केली.



### विकासाचा “दादा” माणूस हरपला – आमदार अमित गोरखे

पिंपरी :-राजकीय क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व आमदार अमित गोरखे यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावनिक श्रद्धांजली अर्पण करणारा संदेश सोशल मीडियावर शेअर केला आहे. या संदेशामध्ये त्यांनी अजित पवार यांच्या सार्वजनिक जीवनातील योगदान, लोकाभिमुख नेतृत्व आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख केला आहे.

अमित गोरखे यांनी आपल्या श्रद्धांजली संदेशात म्हटले आहे की, स्पष्टवक्तेपणा, ठाम निर्णयक्षमता आणि जनतेशी असलेले नाते यामुळे अजित पवार यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात वेगळे स्थान निर्माण केले. अर्थमंत्रीपदाच्या काळात राज्याच्या विकासासाठी, महिला सक्षमीकरण, शेतकरी कल्याण आणि युवकांसाठी राबवलेल्या योजनांचे योगदान अतुलनीय असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. ते खऱ्या अर्थाने विकासाचे दादा होते.

या भावनिक संदेशात त्यांनी पवार कुटुंबीयांप्रती तसेच कार्यकर्त्यांप्रती संवेदना व्यक्त करत, “ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो,” अशी प्रार्थनाही व्यक्त केली आहे.

## राजगुरुनगर कोर्टात वकिलांनी घेतला कामापासून अलिप्त राहण्याचा निर्णय आज शोक सभेचा नियोजन...





उपसंपादक आरिफ शेख

महाराष्ट्र राज्याच्या कानो कोपऱ्यात शोक कळा असताना,संवेदनशीलता दाखवत. राजगुरुनगर वकील संघटना यांचे वतीने नामदार अजित दादा पवार यांच्या दुर्दैवी निधना बाबत शोक व्यक्त करण्यासाठी कामकाजातून अलिप्त राहण्याचा निर्णय घेण्यात आला.अशी माहिती राजगुरुनगर वकील संघटना चे अध्यक्ष ॲड ,वैभव कर्वे व कार्यकारणी यांच्या वतीने देण्यात आली आहे. क्रिमिनल लॉयर्स वगळता राजगुरुनगर खेड कोर्टाच्या कामकाजामध्ये वकील बंधू-भगिनींनी कोट न घालता दिवसभर शोक व्यक्त करताना दिसले. झालेल्या घटनेचा दुःखाचा डोंगर,सर्वत्र निशब्द वातावरण,याचा परिणाम,राजगुरुनगर कोर्टाच्या कामकाजावरही दिसून आला.सगळीकडे हळहळ व्यक्त केली जात होती.किंबहुना विश्वासच बसत नाही,अशी ही परिस्थिती आजही ताजी आहे. राजगुरुनगर वकील बार असोसिएशन चे अध्यक्ष अँड.कर्वे व कार्यकारणी यांनी माननीय न्यायाधीश यांना सदर बाबत विनंती करत माहिती दिली. आणि सन्माननीय न्यायाधीशांनी राजगुरुनगर वकील बार असोसिएशनची मागणी सद्भावना व्यक्त करत मान्य केली. व कुठल्याही प्रकारच्या निकाली आदेश आज दिले जाणार नाहीत याबाबत सहमती दाखवली.अतिशय दुर्दैवी घटना म्हणून या विमान दुर्घटने कडे पाहिले जाते.अजित दादा पवार हे नाव आबाल वृद्धांपासून गोरगरिबांच्या तोंडी सदैव राहणारे आहे.अशी प्रतिक्रिया वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष एडवोकेट वैभव कर्वे यांनी दिली आहे. तसेच संपूर्ण राजगुरुनगर कोर्टामध्ये आज या दुःखद घटनेचे पडसाद उमटलेले दिसले. संपूर्ण कोर्टामध्ये प्रचंड शुकशुकाट होता. क्रिमिनल लॉयर अति महत्त्वाच्या असणाऱ्या कोर्टाच्या कामकाजाव्यतिरिक्त अपवाद वगळता इतर कोणीही काम करताना दिसले नाही.या दुःखाचे सावट दोन दिवस झाले तरी प्रचंड आहे.त्याच अनुषंगाने राजगुरुनगर वकील बार असोसिएशनने आज पुरुष बार रूममध्ये शोकसभेचे आयोजन केले.सकाळी 11 वाजता अशोक सभा सुरू होऊन प्रत्येकाच्या तोंडी अजित दादाच्या कामाचे आणि त्यांचे समवेत आलेल्या अनुभवाचे बोल होते.अतिशय दुर्दैवी घटनेबाबत खरंच प्रत्येकजण निशब्द आहे. ऐनवेळी वकील म्हणून प्रचंड मोठ्या प्रमाणात युक्तिवाद करणारे अनुभवी वकील सुद्धा आज नि शब्द झालेत.



### राज्यपाल आचार्य देवव्रत व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन

बारामती :- राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले.

यावेळी केंद्रीय नागरी विमानवाहतूक मंत्री राममोहन नायडू किंजारापू, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शिक्षणमंत्री दादाजी भुसे, महिला व बाल विकास मंत्री कु. अदिती तटकरे, बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंह राजे भोसले, अजित पवार यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे, आमदार राहूल कुल, ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र पवार आदी उपस्थित होते.